वाचले :

१) आदेश क्र.प्रशा/१/कावि/१७१५/२०२० दि-२८/०९/२०२०.

२) कारणे दाखवा नोटीस क्र.वायसीएमएच/१/कावि/११२६/२०२४ दि.२१/०६/२०२४.

३) डॉ. ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे,सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा यांचा दि.१५/०७/२०२४ रोजीचा विनंती अर्ज

४) मा. अधिष्ठाता,पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय,यांचेकडील दि-३०/०७/२०२४ रोजीचा शिफारशीयुक्त प्रस्ताव.

५) मा.आयुक्त सो.यांचेकडील दिनांक. ०१ /१० /२०२४ रोजीचा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ सामान्य प्रशासन विभाग,
क्र.साप्रवि/९/कावि/८२३/२०२४
दिनांक: ०१ / १० /२०२४

विषय : विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत..
**डॉ.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे,सहाय्यक प्राध्यापक**
**सर्वसाधारण शल्यचिकित्सा.**

**आदेश.**

**ज्याअर्थी**,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालया अंतर्गत पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये **डॉ. ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे** हे गट अ मधील **सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा या अंत्यत जबाबदारीच्या व रूग्णसेवेशी निगडीत अशा** पदावर परिविक्षाधीन कालावधीत कार्यरत आहेत.रुग्णालयीन सेवा ही मानव्य भावनेतून उदयास आलेली एक सेवा भावी संस्था असून त्यामध्ये रुग्णसेवेला व रुग्णाला सर्वाधिक महत्व आहे.त्यानुसार डॉ. बोराडे यांनी समर्पित रूग्णसेवा विचारात घेवून त्यांना नेमून दिलेले कर्तव्य व रूग्णसेवेची जबाबदारी प्राधान्याने पार पाडणे आवश्यक आहे. तथापि डॉ. ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे,सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा हे दि-१७/०१/२०२१ पासुन आजतागायत एकुण १२९६ दिवस विनापरवाना गैरहजर असून त्यांचे गैरहजेरीमुळे रुग्णालयीन महत्वाच्या सेवेत अडथळा निर्माण होत असल्याची बाब उपरोक्त वाचले क्र. ४ प्रस्तावान्वये अधिष्ठाता,पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या निदर्शनास आणुन दिलेली आहे.

**आणि ज्याअर्थी,डॉ.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा** हे दि-१७/०१/२०२१ पासुन आजतागायत एकुण १२९६ दिवस व तदनंतर आजअखेर विनापरवाना गैरहजर आहेत.प्रकरणी पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाने त्यांना वाचले क्र. २ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावली असता त्यांनी वाचले क्र. ३ अन्वये वैयक्तिक कारणास्तव विनापरवाना गैरहजर असलेबाबतचा केलेला खुलासा सुंयक्तिक वाटत नाही. प्रकरणी, विभागप्रमुखांनी वाचले क्र. ४ च्या प्रस्तावान्वये डॉ. बोराडे यांनी विनापरवाना गैरहजर राहुन आदेशातील अट क्र.३ चा भंग केल्याने त्यांचेविरूध्द नियमाधीन कार्यवाही करणेकामी शिफ़ारस केलेली आहे.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र नागरी सेवा(रजा)नियम १९८१ नियम १० नुसार रजा म्हणजे सक्षम प्राधिकायाने स्वेच्छानिर्णयानुसार कामावर अनुपस्थित राहण्यास दिलेली परवानगी होय.हक्क म्हणुन रजा मागता येत नाही.असे असतांना **डॉ. ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा हे** रुग्णालयीन अत्यावश्यक सेवेत विनापरवाना गैरहजर राहून सचोटी,सातत्य व समर्पित रुग्णसेवेविषयी बेफ़िकीरी व अनास्था दशर्वुन **कर्तव्यात नितांत सचोटी व कर्तव्य परायणता न ठेवता कर्तव्यात कसुर केल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होत आहे.त्यांचे** उदघृत गैरवर्तनामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३(१)(एक)(दोन)(तीन) व रजा नियम १० चा भंग झाल्याचा निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

**त्याअर्थी**, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उदघृत प्रकरणी **डॉ. ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा** यांचे विनापरवाना गैरहजेरीमुळे रुग्णालयीन अत्यावश्यक सेवेमध्ये अडथळा निर्माण झाल्याची बाब,वेळोवेळी कारणे दाखवा नोटीसा देवुनही त्यांचे वर्तनात कोणतीही सुधारणा न होता विनापरवाना/विनासुचना गैरहजेरीमध्ये झालेली वाढ, प्रकरणी विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व परिविक्षाधीन कालावधीमध्ये कामकाजाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्याचीबाब विचारात घेता, **डॉ. ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा यांचेविरुध्द** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (१) चे तरतुदींच्या अधिन, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यास प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे. प्रस्तुत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८

( शेखर सिंह )
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

प्रति,

१. **डॉ. ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय,**

प्रत,

१. **विभागप्रमुख- पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय,**

२/- प्रस्तुत आदेश **डॉ. ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा** यांना तात्काळ बजाविणेत येवुन त्यांची पोहोच सादर करावी.डॉ.बोराडे यांचेविरुध्द १५ दिवसांत दोषारोपपत्र ठेवण्याची कार्यवाही करावी. याकामी विलंब झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (क) चे अर्थांतर्गत तरतुदीनुसार नियमाधिन प्रशासकिय कार्यवाही करणेत येईल.

२. वैद्यकिय मुख्य कार्यालय.

३.सामान्य प्रशासन टेबल क्र. १, १२, १४, २२,

४.सामान्य प्रशासन संगणक कक्ष.

२/-मनपा संकेतस्थळावर प्रसिध्दीकामी.